MHAH250004762004

**<u>नियमित दिवाणी दावा नं.२५५/२००४ नि.२२९ वरील आदेश</u>**
**<u>(गुलाब पवार (मयत) व ई. वि. दिनकर पवार व ई.)</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश ६ नियम १७ अन्वये लेखी म्हणण्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे म्हणण्याप्रमाणे सदरहु दाव्यामध्ये प्रतिवादी नंबर १ व २ हयांनी मुळ दाव्याची कैफियत तारीख ०७/०८/२००४ रोजी दिलेली आहे. वादींनी दाव्यामध्ये मागणी करतांना दावा कलम १ई मधील मौजे चिखली कोरेगांव, तालुका श्रीगोंदा येथील जमिनीचे वाटप मागुन ती नुकतीच त्रयस्थ स्त्रीस खरेदी दिलेली आहे व त्या दृष्टीने मुळ कैफियतीमध्ये दुरुस्ती करणे जरुरीचे आहे. त्यामुळे त्यांनी सदर खरेदीखताबाबत मजकुर एक नवीन परिच्छेद लेखी कैफियत मध्ये समाविष्ट करण्यास परवानगी मागितली आहे. सदरची दुरुस्ती ही subsequent event स्वरुपाची व दावा हा वाटपाचा असल्याने कैफियतीमध्ये दुरुस्ती होणे जरुरची आहे. तरी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

३. वादींनी प्रस्तुतच्या अर्जाला त्यांचे लेखी म्हणणे देवुन आक्षेप घेतला आहे की, प्रतिवादींचा सदरचा अर्ज खरा नाही. वादीस मान्य नाही. अर्ज कायदेशीर नाही. प्रतिवादींचे अर्जातील कथन की, मौजे चिखली येथील जमीन गट नं.६७/१ पैकी ० हे. ४० आर क्षेत्र वादी नं.१ हीस तीला कायदेशीर गरज नसताना दिली हे म्हणणे खरे नाही. वादीस कबुल नाही. प्रतिवादींचे अर्जातील कथन की, Non joinder of necessary parties चा बाधा येतो हे म्हणणे खरे नाही. कारण खरेदीदार यांनी खरेदी घेतलेले क्षेत्र हे या वादींचे स्वतंत्र खरेदी मालकीचे होते व आहे व त्याबाबत मा.न्यायालय जो काही गुणदोषावर निकाल देईल तो खरेदीदार यांचेवर कायद्याने बंधनकारक राहत असल्याने त्यांना दाव्यात

पार्टी करण्याची आवश्यकता नाही. वादींनी त्यांचे स्वतःचे हिस्साचे क्षेत्र विक्री केलेले असल्याने त्यामुळे प्रतिवादींचे हिस्सयावर कोणताही परिणाम होत नाही. त्यामुळे कैफियत दुरुस्ती करण्याची कायद्याने आवश्यकता नव्हती व नाही. केवळ दाव्याचे कामकाज लांबविणेकरीता सदरचा अर्ज प्रतिवादींनी दिलेला असल्यामुळे तो खर्चासह रद्द करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्याकरता खालील मुद्दे माझे विचारार्थ आले असून त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविणेत आले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | सदरचे लेखी कैफियत दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे मुळ भुमीकेत अगर लेखी कैफीयतच्या स्वरुपामध्ये बदल होत आहे का ? | नाही. |
| २) | प्रतिवादी यांचा सदरचा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणेस पात्र आहे का ? | होय. |
| ३) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ :–**

५. दोन्ही पक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षाच्या विधीज्ञांनी त्यांच्या अर्ज व लेखी म्हणण्यामधील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे.

६. प्रतिवादी यांचा अर्ज व लेखी कैफियत (नि.१४) चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.०१ चे कथन असे आहे की, दावा मिळकतीत वादी यांचा कुठल्याही हिस्सा नाही. प्रतिवादी यांचे पुढे कथन आहे की, दावा प्रलंबित असताना वादींनी दावा मिळकत १ई ही त्रयस्थ व्यक्तीस हस्तांतरीत केली आहे. त्यामुळे अर्जात नमुद दुरुस्ती त्यांच्या लेखी कैफियत मध्ये करणे त्यांना आवश्यक झाले आहे. प्रतिवादींनी त्यांच्या अर्जाच्या पुष्ठार्थ मौजे चिखली येथील गट क्र.६७/१ च्या ७/१२ उता–याची प्रत तसेच फेरफार क्र.३७४० ची प्रमाणीत नक्कल दाखल केली आहे. सदर फेरफारचे अवलोकन

केले असता दि.१२/०७/२०२४ रोजी नंदा गुलाब पवार यांनी ०.४० आर क्षेत्र कविता गणेश झेंडे यांने नोंदणीकृत दस्त क्रमांक ४६६४ अन्वये विक्री केल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचा दावा हा वाटणी होवून स्वतंत्र ताबा मिळण्याकरता व निरंतर मनाई हुकुम मिळणेकरिता दाखल केलेला दिसून येतो. अभिलेखावर दाखल कागदपत्राचे अवलोकन केले असता वादी यांनी दावा मिळकतीतील काही क्षेत्र दावा प्रलंबित असताना हस्तांतरीत केल्याचे प्रथमदर्शणी दिसुन येते. त्यामुळे प्रतिवादी मागता ती दुरुस्ती ही दावा प्रलंबित असताना झालेल्या हस्तांतरामुळे करणे क्रमप्राप्त झाले आहे असे दिसुन येते. त्यामुळे त्या अनुषंगाने प्रतिवादींना योग्य ती दाद मागण्याची संधी देणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे सदर अर्जा अन्वये प्रतिवादींनी प्रार्थीत केलेली दुरुस्ती मंजूर करणे योग्य व न्यायोचित होईल.

७. प्रतिवादी यांनी प्रार्थीत केलेली लेखी म्हणणे व लेखी कैफीयतमधील दुरुस्ती पाहिली असता माझे मते सदर दुरुस्ती ही दावा प्रलंबित असताना वादींनी केलेल्या हस्तांतरामुळे उद्भवलेली असून त्यामुळे प्रतिवादी यांचे मुळ लेखी कैफीयत मध्ये अगर त्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. उलटपक्षी, दावा गुणदोषावर चालणेस मदतच होणार आहे. सदर दुरुस्तीमुळे वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु, सदरचा अर्ज मंजूर न झालेस प्रतिवादी यांचे न्यायहक्कास बाधा निर्माण होवून दाव्याची अनेकता वाढणार आहे. त्यामुळे दाव्याची अनेकता व कार्यबाहुल्य टाळणेसाठी देखील न्यायास्तव हा अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. तसेच नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार जरी केला तरी सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरते.

८. येणेप्रमाणे वरील सर्व कारणमिमांसेचा विचार केला असता, प्रस्तुत दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे मुळ लेखी म्हणणे व लेखी कैफीयतमध्ये अगर त्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होत असलेचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरचा प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र असलेचे निष्कर्षापर्यंत मी येत आहे. त्याप्रमाणे मुद्दा क्र.१ व २ यांचा निष्कर्ष तसा देवून मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष देणेकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२) प्रतिवादी यांनी वर नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती ही वेळेत करावी व दुरुस्ती लेखी म्हणणे व लेखी कैफीयत प्रत पुढील तारखेपर्यंत द्यावी.

३) प्रस्तुत अर्जाचा खर्च दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यात यावा.

KANAKDANDE SHRIHARI
Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2025.08.26 14:48:35 +0530

( एस.आर.कनकदंडे)

**दिनांकः२६/०८/२०२५.** **२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**पारनेर, जि.अहमदनगर.**